# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ४३

**(सभावृत्तांत)**

दिनांक – १०/०१/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक १०/०१/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ढंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.राजू मिसाळ
१५) मा.अमित राजेंद्र गावडे
१६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.आष्टीकर-प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.दुधेकर-सहशहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोराटे,मा.राऊत,मा.झगडे-सहाय्यक आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,मा.निकम,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.कुलकर्णी,मा.गलबले, मा.कांबळे,

मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले,मा.मोरे,मा.घुबे,मा.पवार-कार्यकारी अभियंता,मा.आगळे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ४८) | तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर समुह संघटक पदांचे नियुक्तीबाबत... |
| विषय क्रमांक ४९) | स्वच्छ भारत अभियान जनजागृती मोहीमेची प्रसिद्धी करणेबाबत स्वच्छ सर्व्हेक्षण २०१८ साठी कॅलेंडर छपाईबाबत... |
| विषय क्रमांक ५०) | स्थापत्य-बीआरटीएस विभागाकडील कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत... |
| विषय क्रमांक ५१) | महानगरपालिकेचे राजमाता जिजामाता सांस्कृतिक भवन भाडेतत्वावर देणेबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५२) | मनपाचे विकास कामांची मटेरियल तपासणी करुन घेणेबाबत-मा.कैलास बारणे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५३) | मदनलाल धिंग्रा मैदानाच्या कडेने जाळी बसविणेबाबत – मा.लक्ष्मण उंडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५४) | महानगरपालिकेचे कासारवाडी येथील महिला जिम भाडेतत्वावर देणेबाबत – मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५५) | मानपत्र देणेबाबत – मा.कुंदन गायकवाड, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५६) | मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२७१८ दि.६/१०/२०१५ मध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक ५७) | प्रभाग क्र.३० कासारवाडी येथील विविध ठिकाणी नामकरण करणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उत्तम केंदळे यांचा प्रस्ताव – |

--------

मा.कैलास बारणे - दिनांक ०३/०१/२०१८ व दि.०४/०१/२०१८ रोजी झालेली सभा (कार्यपत्रिका क्रमांक ४२) चे सभावृत्तांतामध्ये विषय क्रमांक ५८ पासून विषय क्रमांक ८३ पर्यंत दि.०३/०१/२०१८ ऐवजी दि.०४/०१/२०१८ अशी दुरुस्ती करण्यात यावी व या दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत यावा.

दिनांक ०३/०१/२०१८ व दि.०४/०१/२०१८ रोजी झालेली सभा (कार्यपत्रिका क्रमांक ४२) चे सभावृत्तांतामध्ये विषय क्रमांक ५८ पासून विषय क्रमांक ८३ पर्यंत दि.०३/०१/२०१८ ऐवजी दि.०४/०१/२०१८ अशी दुरुस्ती करुन व या दुरुस्तीसह सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(नवनियुक्त मा.स्मिता झगडे, क्षेत्रिय अधिकारी ग व ड क्षे.कार्यालय यांनी त्यांचा परिचय करुन दिला.)

(श्री.गौरव अशोक शिंदे यांनी बँकॉक,थायलंड येथे झालेल्या मिस्टर एशिया २०१७ या स्पर्धेत ८० किलो वजनी गटामध्ये ब्रॉँझ पदक मिळवले आहे. दि.१/३/२०१८ रोजी अमेरीका येथे होणा-या स्पर्धेकरिता भारतीय संघामध्ये त्यांची निवड झाली आहे. म्हणून मा.सभापती व मा.स्थायी समितीच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.)

----------

ठराव क्रमांक – १९१८ विषय क्रमांक – १
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– प्रशासन
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/११०४/२०१७दि.०६/१२/२०१७
विषय - मा.स्थायी समिती सभा ठराव क्र ९५८, दि.१३/०९/२०१७ नुसार श्री.जागडे अरुण हरिभाऊ, लिपिक यांच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने अहवाल अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९१९ विषय क्रमांक – २
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– प्रशासन
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/१२९२/२०१७दि.०६/१२/२०१७
विषय-मा.स्थायी समिती सभा ठराव क्र ९१६, ९१७, ९१८, ९१९, ९२१ व ९२२, दि.०६/०९/२०१७ नुसार अनुक्रमे श्री.चव्हाण संदेश सखाराम, कार्यकारी अभियंता (वि) (तत्कालीन उपअभियंता), चव्हाण माणिक मारुती, उपअभियंता (वि), श्री.कावळे महेश दिगंबर, कनिष्ठ अभियंता (वि), श्री.आडसुळे अशोक नागो, कनिष्ठ अभियंता (वि), श्री.देशमुख नितीन वासुदेव, उपअभियंता (वि) व श्री.शेख अकबर सुलतान, कनिष्ठ अभियंता (वि) यांच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने अहवाल अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२० विषय क्रमांक – ३

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– प्रशासन

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/९/कावि/१२९३/२०१७दि.०६/१२/२०१७

विषय- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र ९१६, ९१५, ९२० व ९२३, दि.०६/०९/२०१७ नुसार श्री.चव्हाण संदेश सखाराम, कार्यकारी अभियंता (वि) (तत्कालीन उपअभियंता), श्री.कातोरे प्रकाश बाबुराव, कनिष्ठ अभियंता (वि), श्री.पाटील एकनाथ बंडू, उपअभियंता (वि) व श्रीमती पवार दमयंती पंडित, कनिष्ठ अभियंता (वि), यांच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने अहवाल अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

----------

ठराव क्रमांक –१९२१ विषय क्रमांक – ४

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– क्रिडा

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ– १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ७७ दिनांक ०८/१२/२०१७ नुसार,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या राजे शिव छत्रपती व्यायामशाळा (उद्योगनगर) चिंचवड, मनपा व्यायामशाळा ही व्यायामशाळा उद्योगनगर महिला विकास केंद्र, चिंचवड येथील राजे शिव छत्रपती व्यायामशाळा मनपा व्यायामशाळा केंद्रला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रु.२,०००/-मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यात देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२२ विषय क्रमांक – ५

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– क्रिडा

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/१२१/१७ दि.१८/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.30/37/2017-18 अन्वये प्रभाग क्र.४ कृष्णानगर मधील शिवतेजनगर मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.पेव्हवे कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रू.1,40,05,135/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चाळीस लाख पाच हजार एकशे पस्तीस फक्त) पेक्षा 1.72% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 0.03% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.1,37,64,247/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१९२३ विषय क्रमांक – ६

दिनांक – १०/०१/२०१८

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ– १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव...

२) मा.क्रिडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ८२ दिनांक २२/१२/१७ नुसार,

प्रभाग क्र.१४ मधील प्रबोधनकार ठाकरे फिटनेस सेंटर ही व्यायामशाळा अष्टविनायक महिला प्रतिष्ठान या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२४ विषय क्रमांक – ७

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य फ मुख्यालय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/१४०/१७ दि.२८/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.30/47/2017-18 अन्वये प्रभाग क्र.१ ज्योतीबानगर सोनवणे वस्ती २४.०० डी पी रस्ता रूंदीकरण करून स्टॉर्मवॉटर लाईन टाकुन रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.एस.के.येवले ऍ़न्ड कं. नि.र.रू.1,86,71,764/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी शहाऐंशी लाख एक्काहत्तर हजार सातशे चौसष्ठ फक्त) पेक्षा 4.90% जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 11.13% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.1,95,86,680/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय – अ) <u>महापालिका अधिकारी/कर्मचारी यांचे बायोमेट्रीक थम्ब इम्प्रेशनबाबत –</u>**

१) स्थापत्य,विद्युत, पाणीपुरवठा, जलनिःसारण विभाग तसेच आरोग्य विभागाचे कर्मचा-यांचे बायोमेट्रीक थम्ब इम्प्रेशन करणेबाबत, ओव्हरटाईम देणेबाबत, पेट्रोल अलाऊंस मिळणेबाबत, विषय मांडला आहे. कार्य.अभियंत्या पासून जे.ई., प्लंबर इ. पर्यंत सर्व कर्मचारी सकाळपासून ऑन फिल्ड असतात. किमान कार्य.अभियंता यांना या नियमातून सवलत देणेत यावी. कारण नगरसेवक बोलवतील त्यावेळी त्यांना वॉर्डमध्ये हजर रहावे लागते. स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनिःसारण या विभागांचे कामाचे स्वरुप पाहता त्यांच्या कामाचे तास निश्चित ठरवू शकत नाही. प्रशासन ओव्हरटाईम देऊ शकत नसेलतर कार्य.अभियंता, जे.ई. यांना पेट्रोल अलाऊंस वाढवून द्यावा. नगरसचिव विभागातील अध्यक्षांच्या केबीनमधील कर्मचारी यांना अध्यक्ष जोपर्यंत आहेत तोपर्यंत कार्यालयीन वेळेनंतर थांबावे लागते.

कार्यपत्रिका फायनल करण्याच्या दिवशी नगरसचिव विभागाचा संपूर्ण स्टाफ थांबलेला असतो. म्हणून नगरसचिव विभागाला देखील ओव्हरटाईम देण्यात यावा.

२) थेरगाव डांगे चौक, शिवाजी पुतळ्यासमोर मच्छीमार्केटमध्ये जे बायोमेट्रीक मशीन आहे, ते बील भरले नाही म्हणून लाईट कट केल्यामुळे बंद पडले आहे. त्यामुळे कर्मचा-यांना बायोमेट्रीक हजेरी लावता येत नाही. तरी विद्युत विभागाचे संबंधित अधिका-यांनी यात लक्ष घालून समस्येचे निराकरण करावे.

**ब)** कनिष्ठ अभियंता श्री.गणबोटे यांना अतिरिक्त भार देऊन त्यांची बदली करुन त्यांना दिघी भागात पाठवले आहे. श्री.गणबोटे यांनी या प्रभागात व्यवस्थित काम केले असल्यामुळे त्यांची बदली झाल्यानंतर तेथे कामात अडचणी निर्माण झाल्या आहेत. तरी प्रशासनाने याबाबतीत लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी. एक जे.ई. आठ प्रभाग सांभाळू शकत नाही. कार्य.अभियंता मा.गायकवाड, आपण सन्मा.नगरसेवक मा.लक्ष्मण उंडे आणि मा.अनुराधा गोफणे यांच्या प्रभागाकरीता कार्यक्षम कनिष्ठ अभियंत्याची (तात्पुरती,पर्यायी) व्यवस्था करावी. दिघी भागाकरीता नवीन कनिष्ठ अभियंता द्यावा. अशा बाबतीत त्या भागातील नगरसेवकांनाही विचारले पाहिजे.

**क)** प्रत्येक प्रभाग अधिका-यांकडे प्रभागासह अतिरिक्त विभागाचा कार्यभार देण्यात यावा.

---------------

ठराव क्रमांक –१९२५ विषय क्रमांक – ८

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य,शहर अभियंता कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/शअ/तां/४/१७५/१७ दि.२९/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांमधून भुमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी मनपाकडे विविध शासकीय/निमशासकिय तसेच खाजगी संस्थेकडून रस्ता खोदाई परवानगीसाठी प्रकरणे वेळोवेळी सादर होत असतात. सदर सेवावाहिन्या नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३९ अन्वये सदर संस्थांना त्यांचेकडील भूमिगत सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईस परवानगी महापालिके मार्फत देण्यात येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४१(२) अन्वये संबंधित कंपनीकडून सदर खोदलेला रस्ता दुरुस्त करण्यासाठी जो खर्च येईल तो वसूल करावयाचा आहे. त्यासाठी सदर खोदलेले रस्ते दुरुस्तीसाठी मनपाने दर निश्चित केले असून सदर दर वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. मनपाच्या सदर प्रचलित दरानुसार रस्ता दुरुस्तीपोटी येणारा खर्च संबंधित कंपनीकडून आगाऊ भरून घेण्यात येतो. सद्यस्थितीत सदर रस्ते दुरुस्ती शुल्कामध्ये रस्ता दुरुस्ती खर्च अंदाजे सरासरी र.रु.६५००/- व मनपा अधिभार सरासरी र.रु.३०००/- असे प्रती मी. प्रमाणे आकारण्यात येतो. त्यानुसार अद्याप पर्यंत सर्व खाजगी, शासकीय/ निमशासकिय संस्थांना (महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादीत वगळून) त्यांच्या सेवावाहिन्या टाकण्यासाठी वरीलप्रमाणे शुल्क आकारुन रस्ता खोदण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे वाहतुकीस होणारा अडथळा व त्यामुळे

होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांच्या सुरक्षित वाहतूकीसाठी मनपास रितसर निविदा प्रक्रिया करुन, सदर खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करावी लागते.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील मागणीः-</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडील पायाभुत आराखडा अंतर्गत भुमिगत सेवा वाहिन्यांसाठी रस्ता खोदाईबाबत दि.२३/०१/२०१० रोजी मा.नामदार श्री. अजितदादा पवार, उर्जामंत्री तथा पालकमंत्री यांनी, कौन्सिल हॉल, पुणे येथे झालेल्या बैठकीत सुचित केलेनुसार व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी दि.१०/०२/२०१०, दि.१३/१२/२०१०, दि.६/११/२०११ व दि.२५/०३/२०११ कळविलेनुसार, त्यांच्याकडील पायाभुत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे आकारणी करुन रस्ता खोदाईस परवानगी द्यावी व याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) जो निर्णय देईल त्याप्रमाणे उर्वरित रक्कम महावितरणाने भरणे बंधनकारक राहिल असे धोरण ठरलेले आहे. तथापि, अद्यापपर्यंत सदरबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमइआरसी) यांचेकडून निर्णय प्राप्त नाही. त्यानुसार, मा. आयुक्त यांचेकडील दि.२०/०२/२०१०, दि.२३/१२/२०१० व १४/११/२०११ च्या मान्य प्रस्तावानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभूत आराखडा-१ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी र.रु.१५००/- प्रति रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात आलेली आहे, व सदर वाहिन्यांसाठी खोदलेल्या चरांची दुरुस्ती मनपामार्फत करण्यात येते.म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत भुमिगत केबल टाकणेसाठी मा.आयुक्त यांच्याकडील दि.१०/०२/२०१५ चे मान्य प्रस्तावानुसार व आदेश क्र. स्थापत्य/शअ/तां/४/५९/२०१५, दि.१०/०२/२०१५ अन्वये र.रु.२३००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे (एकत्रित रस्ता दुरुस्ती खर्च व मनपा अधिभार) याप्रमाणे सवलतीच्या दराने शुल्क आकारुन रस्ता खोदाईस परवानगी देण्यात येत होती. म.रा.वि.वि.कं.मर्या., यांच्याकडील पायाभुत आराखडा-अंतर्गत देणेत आलेल्या मागील ३ वर्षाचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | परवानगी देणेत आलेल्या रस्ता खोदाईची लांबी कि.मी. मध्ये | मनपा कोषागारात जमा र.रु. (लाखात) | दर प्रती रनिंग मीटर र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१५-१६ | ७९.४२ | १८२६.६६ | २३००/- |
| २ | २०१६-१७ | १.१५२ | २६.५० | २३००/- |
| ३ | २०१७-१८ | ०.१ | २.३० | २३००/- |

पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.पथ/५२८१ दि.२२/११/२०१७ नुसार मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेनुसार मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांची फेरप्रस्तावास मान्यता मिळेल या भरवशावर महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस पुणे

महानगरपालिका ट्रेंचिंग गाईड लाईन नुसार पुणे महानगरपालिकेकडे दाखल असलेले तसेच भविष्यातील खोदाई प्रस्तावास ओपन ट्रेंचिंग पध्दतीने र.रु.२,३५०/- प्रती रनींग मीटर दर आकारुन मान्यता देणेत येत असलेबाबत म.रा.वि.वि.कं.मर्या.यांना कळविण्यात आलेले आहे. मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र)००४४९०,दि.१६/११/२०१७ व क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र)००४५८५, दि.२४/११/२०१७ च्या पत्रांन्वये म.रा.वि.वि.कं.मर्या., यांनी महापालिका हद्दीमध्ये यांच्याकडील पायाभुत आराखडा-२ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS)), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning & Development Committee (DPDC)), व इतर योजने अंतर्गत भुमिगत केबल टाकण्याकरीता व दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास र.रु.२,३५०/- प्रती रनिंग मीटर या दराप्रमाणे शुल्क आकारुन परवानगी देणेबाबत मागणी केलेली आहे. सदर मा.मुख्य अभियंता, पुणे परिमंडळ, पुणे यांचेकडील पत्र क्र.मु.अ./पु.प./तांत्रिक/काअ(प्र) ००४५८५,दि.२४/११/२०१७ मध्ये नमुद केलेनुसार म.रा.वि.वि.कं. मर्या., यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने ७०.१६ किमी. उच्चदाब वाहिनी व २८.३५ किमी. लघुदाब वाहिनी व इतर कामे प्रस्तावित असल्याचे कळविले आहे. सदर कामांची एकूण लांबी ९८.५१ किमी. येत आहे. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाने पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि.१८ मार्च २०१६ अन्वये कळविले नुसार “महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भुमिगत विज वाहीनी टाकण्यासाठी नागपुर महानगरपालिका आणि महावितरण यांचेत Road reinstatement बाबत झालेला सामंजस्य करारनामा नमुना समजून त्यानुसार सामंजस्य करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करणेबाबत” कळविले आहे. सदर सामंजस्य करारनाम्याची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सदर सामंजस्य करारनाम्यातील ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

Ø महानगरपालिका व महावितरण या दोन्ही संस्था नागरीकांसाठी पायाभूत सुविधा पुरविणा-या संस्था आहेत.

Ø विज वाहिन्या टाकण्याबाबत महानगरपालिका व महावितरण यांच्या जबाबदा-या सामंजस्य करारनाम्यातील मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद सविस्तररित्या नमुद केलेले आहे.

Ø दोन्ही संस्था विज वाहिन्या टाकण्यासाठीच्या कामांसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) यांची नेमणूक करेल.

Ø महानगरपालिके मार्फत स्थापत्य विभागाचे संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता विज वाहिन्या टाकणे बाबतच्या कामांसाठीच्या कार्यवाहीसाठी नोडल ऑफिसर (समन्वय अधिकारी) असतील.

Ø महावितरण यांनी नोडल ऑफिसर यांचेकडे सविस्तर अर्ज सादर केल्यानंतर दोन्ही संस्थांच्या अधिका-यांसमवेत एकत्रित सर्वेक्षण करुन झाल्यानंतर प्रकरण मा.शहर अभियंता यांचेमार्फत मा. आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर केले जातील.

Ø मा.आयुक्त यांच्या मान्यतेनंतर महावितरण यांचेकडून र.रु. १००/- प्रती रनिंग मीटर प्रमाणे देखरेख शुल्क (सुपरविजन चार्जेस) प्रथमत:मनपा कोषागारात भरुन घेणेत येतील व तदनंतर महावितरण यांना भुमिगत विज वाहिनी टाकणेसाठी रस्ते खोदाईस परवानगी देणेत येईल.

Ø सदर खोदलेले रस्त्यातील चर महावितरण यांनी महापालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेद प्रमाणे नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी महापालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे स्थापत्य विभागाच्या अभियंतांचे देखरेखीखाली तातडीने दुरुस्त करुन पूर्ववत करावयाचे आहे.

Ø सदर चर दुरुस्तीनंतर महावितरण यांनी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे नोडल ऑफिसर यांचेकडून रस्त्यातील खोदलेला चर महानगरपालिकेने विनिर्देशित केलेल्या काटछेदाप्रमाणे तातडीने दुरुस्त केलेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे.

Ø सदर कामासाठीचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) वरील प्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्राच्या दिनांकापासून दोन (२) वर्षांचा असेल.

Ø सदर दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) मध्ये महावितरण यांनी तातडीने दुरुस्त केलेले चर सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महावितरण यांची राहील.

Ø जर महावितरण यांनी खोदलेला चर तातडीने दुरुस्त करुन रस्ता पुर्ववत करण्यास वा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period)मध्ये सदरचा दुरुस्त केलेला चर सुस्थितीत ठेवण्यास असमर्थ ठरल्यास नागरीकांच्या वाहतुकीच्या व सुरक्षिततेसाठी सदरचे चर महानगरपालिकेला दुरुस्त करुन पूर्ववत करावयास लागल्यास त्यासाठी महानगरपालिकेस आलेला खर्च महावितरण कडून महापालिकाविज पुरवठ्याबाबत घेत असलेल्या सुविधाबाबतचे विज बिलातून वजा करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण-२९१५/प्र.क्र.३७८/नवि-२० दि. १८ मार्च २०१६ नुसार महावितरण व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार महावितरणकडील भुमिगत सेवावाहिन्या टाकण्याबाबतची कार्यवाही करणेबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. महापालिका सभेला आहे. तरी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.यांना त्यांचेकडील पायाभुत आराखडा - २ अंतर्गत या व्यतिरीक्त केंद्र शासन योजने अंतर्गत एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत (Integrated Power Development System (IPDS), जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत (District Planning & Development Committee (DPDC), व इतर योजने अंतर्गत भुमिगत सेवा वाहिनी टाकण्याकरीता व सेवा वाहिनी दुरुस्तीसाठी रस्ता खोदाई करण्यास महावितरण

व नागपुर महानगरपालिका यांचेतील सामंजस्य करारनाम्यानुसार परवानगी देणेबाबतची कार्यवाही करणेबाबतचे धोरणात्मक निर्णयासाठी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-१)** मा.महापालिका सभेकडे हा विषय मान्यतेसाठी जाणार आहे. तेथे या विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे. त्यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. या कंपनीचे डिसिजन मेकर/जबाबदार/वरिष्ठ अधिकारी (शहरातील सर्व डिव्हिजनचे अधिकारी, ऑन फिल्ड असणारे अधिकारी) यांनी सभेस उपस्थित रहावे. या विषयाचे रितसर सादरीकरण (PPP) करावे.

**२)** रस्ता खोदाई कुठे करणार आहेत, काय करणार आहेत, साईड मार्जिनमध्ये करणार आहेत का, कुठे कुठे काय काम करणार आहेत, याचा नकाशा द्या. स्थानिक नगरसेवकांना तसेच मा.स्थायी समितीस याची माहिती द्यावी.

**३)** पुढील मा.स्थायी समिती सभेस एमएसईबीचे आणि पीएमपीएमएलचे डिसिजन मेकर/जबाबदार/वरिष्ठ अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

----------

ठराव क्रमांक –१९२६ विषय क्रमांक – ९

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१७६१/२०१७ दि.२९/१२/१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/३-२०१७-१८ सांगवी किवळे बीआरटीएस रस्त्यावरील जगताप डेअरी साई चौक ते मुकाई चौक पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी मे.एस.के.यवले अॅण्ड कं. नि.र.रु.२,८०,१०,५८२/- (अक्षरी र.रू.दोन कोटी ऐंशी लाख दहा हजार पाचशे ब्याऐंशी फक्त) पेक्षा ५.००% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा ०.११% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.२,६६,१०,०५२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२७ विषय क्रमांक – १०

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/४०९/२०१७ दि.३०/१२/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसीस विभागाने त्यांचेकडील निप्रो कंपनीच्या डायलिसीस मशीन Sr.No.13C8301E च्या दुरुस्तीची मागणी केलेनुसार संबंधित मशीनच्या दुरुस्तीसाठी आवश्यक स्पेअर पार्टचे एकूण र.रु.१,५५,०१८/- (अक्षरी र.रू. एक लाख पंचावन्न हजार अठरा फक्त) चे दर पत्रक संबंधित उत्पादित कंपनी मे.निप्रो मेडीकल इंडिया प्रा.लि., मुंबई यांनी सादर केले होते. सदरचे दरपत्रक स्विकृत करणेत आलेले असुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सबब निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने उत्पादित कंपनीकडून आवश्यक स्पेअर पार्ट खरेदी करणेकामी निर्गत करणेत आलेल्या आदेशाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२८ विषय क्रमांक – ११

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/०३/कावि/४१८/२०१७ दि.३०/१२/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहे. त्या शाळामंधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ विकासाच्या दृष्टीने मनपा तर्फे विविध उपक्रम राबविणेत येत असतात. त्यानुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिकेच्या १८ माध्यमिक विद्यालयातील इयत्ता ५ वी चे ३६ व इयत्ता ८ वी चे ४३० विद्यार्थी स्कॉलरशिप परिक्षेसाठी बसविणेत आले होते. सदर विद्यार्थ्यांची परीक्षा फी ची रक्कम मुख्याध्यापकांनी स्वत: भरली असूनसदर रकमेची प्रतिपुर्ती करणेत आलेली असुन 18 माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यपकांना रक्कम रु.22,940/- अदा करणेत आलेली आहे. सदरच्या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी स्कॉलरशिप परीक्षा फी शुल्काची रक्कम र.रु.22,940/- (अक्षरी रक्कम रुपये बावीस हजार नऊशे चाळीस फक्त) च्या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९२९ विषय क्रमांक – १२
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– लेखा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१२०८५/२०१७ दि.२२/१२/१७

विषय- सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकातील अ क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागाच्या कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/घट करणेबाबत...

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३० विषय क्रमांक – १३
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग-ग क्षेत्रिय आरोग्य कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गक्षेका/आ/३/कावि/१०१/२०१७ दि.२७/१२/१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.जय गणेश एंटरप्रायजेस पिंपरीगाव यांचेकडून मोशी कचरा डेपोसाठी प्रती वाहन २ खेपांसाठी र.रू.५,१३०/- व भोसरी कचरा स्थानांतरण केंद्रासाठी प्रती वाहन २ खेपांसाठी र.रू.४,९००/- या दराने दि.२६/०९/२०१७ ते २०/११/१७ तसेच १/१/२०१८ पासून आरोग्य मुख्य कार्यालयाकडील अशा प्रकारच्या कामांचे आदेश देण्यात येणा-या दिनांक पर्यंत वाहन उपलब्ध करून घेणेस व याकामी येणा-या वाढीव खर्चास ब क्षेत्रिय कार्यालयाकडील “कचरा उचलणे व वाहतुक करणे” या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** –१) निविदा ओपन करा. पुढील आठवड्यात विषय विषयपत्रिकेवर आला पाहिजे.

२) सर्व प्रभाग अधिका-यांना तसेच मा.सहा.आयुक्त आरोग्य यांना सूचना आहे की, त्यांनी स्वच्छतेचे काम करणा-या नवीन ठेकेदारांकडे माणसे कमी पडत असतील तर जुन्या ठेकेदारांकडे काम करत असलेल्या कामगारांना तिथे घ्यावे. त्यातील एकही माणूस कमी करु नये. कामगार कमी आहेत असे कारण सांगून ठेकेदार काम करत नसतील तर त्यांना नोटीसवजा पत्र द्यावे. त्यांना बाद करुन टाका. ऑन फिल्ड गेल्यावर जेवढी माणसे नेमलेली आहेत, तेवढी उपलब्ध नसतीलतर ठेकेदाराला आर्थिक दंड लावायला सुरुवात करा. कामाच्या दर्जात कुठेही तडजोड करु नये. प्रभागांतील सर्व नगरसेवक व ठेकेदार यांना बोलावून त्यांची बैठक लावा. म्हणजे त्यांच्या वॉर्डमध्ये कोण ठेकेदार काम करतो, किती लोक आहेत, कोणाला कॉल केला पाहीजे हे त्या नगरसेवकांना देखील कळू देत.

३) पुणे-मुंबई हायवे, फुगेवाडी,कासारवाडी ओव्हर ब्रीज, बीआरटीएस रस्ते, फूटपाथ येथे स्वच्छता दिसत नाही. हाय-वे साठी स्वतंत्र टेंडर केले पाहीजे. शहरातील मुख्य रस्ते झाडण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा उपलब्ध नाही. कासारवाडी ओव्हर ब्रीज येथे

तर रोज रात्री जत्रा भरल्यासारखी स्थिती असते. यासंदर्भात प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष घालावे.

----------

ठराव क्रमांक –१९३१ विषय क्रमांक – १४
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– लेखा कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/४४/२०१८ दि.१/१/२०१८
विषय - तरतूद वर्गीकरणाबाबत...

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३२ विषय क्रमांक – १५
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/३/२०१८ दि.०२/०१/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.११.१२.२०१७ ते दि.१७.१२.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/३/२०१८ दि.०२.०१.२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३३ विषय क्रमांक – १६
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/२/२०१८ दि.०२/०१/२०१८

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०४.१२.२०१७ ते दि.१०.१२.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/२/२०१८ दि.०२.०१.२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३४ विषय क्रमांक – १७

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य फ मुख्यालय

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/१४६/१८ दि.३/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.35-8-2017-18 अन्वये प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मधील एल.आय.सी.इमारत ते पवळे उड्डाणपुलापर्यंतच्या रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एस.के.येवले ॲन्ड कं.यांची नि.र.रू.52,37,476/- (अक्षरी र.रु.बावन्न लाख सदतीस हजार चारशे शहात्तर फक्त) पेक्षा 0.10% जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 0.07% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.52,42,713/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३५ विषय क्रमांक – १८

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य ड मुख्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/ड-मुख्य/३८१/१७ दि.०३/०१/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.30/2/2017-18 अन्वये पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.लोणावळा कन्स्ट्रक्शन कं. यांची नि.र.रू.2,80,08,669/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी ऐंशी लाख आठ हजार सहाशे एकोणसत्तर फक्त) पेक्षा 4.15% जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 0.06% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.2,91,71,029/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-**१) स्थायी समिती सभेमध्ये विषयाला मंजूरी मिळाल्यानंतर लगेच त्या कामाला सुरुवात झाली पाहीजे. कोणाला पटत नाही म्हणून काम सुरु केले नाही असे चालणार नाही. मा.शहर अभियंता यांनी असे सांगितल्याचे निदर्शनास आल्यास मा.शहर अभियंता यांना त्यास जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. दिलेल्या मुदतीत काम सुरु होऊन मुदतीतच काम पूर्ण झाले पाहीजे.

२) गेले तीन/चार महिन्यांपूर्वी कामास मान्यता देऊनदेखील आजपर्यंत फिल्ड वर्कला सुरुवात केलेली नाही अशा कामांचा आढावा घ्यावा. १८ महिने मुदतीचे काम सात महिन्यांत करणार असतील तर त्या कामाला दर्जा राहणार नाही, याबाबत प्रशासनाने परिपत्रक जारी करावे.

३) मा.मुख्यलेखापाल यांनी बिलिंग सिस्टीम काय असली पाहीजे ते सांगावे. चार महिन्यांपूर्वी मंजूरी दिलेल्या कामांची बीले आली पाहीजेत.

४) सगळ्या नगरसदस्यांना विश्वासात घ्यावे. मा.पक्षनेते, मा.महापौर यांना विचारात घ्या. ज्या कामांच्या वर्कऑर्डर दिल्या आहेत, प्रशासनाने त्यांच्या कामाकडे लक्ष द्यावे.

----------

ठराव क्रमांक –१९३६ विषय क्रमांक – १९

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य ब मुख्यालय

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/ब-मुख्य/२४६/१८ दि.३/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.35/1/2017-18 अन्वये प्रभाग क्र.१८ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणेकामी मे.आदित्य एन्टरप्रायजेस यांची नि.र.रू.55,95,664/- (अक्षरी र.रु.पंचाव्वन्न लाख पंच्याण्णव हजार सहाशे चौसष्ठ फक्त) पेक्षा 23.79% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.42,64,456/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३७ विषय क्रमांक – २०

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– जलनि:सारण

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/६०६/१७ दि.२६/१२/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.7/1/2017-18 अन्वये भाटनगर मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत विशाल थिएटर परीसर व उर्वरित ठिकाणी मलनिःसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी M/S.KAPIL CONSTRUCTION यांची नि.र.रू.59,99,989/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे एकोणनव्वद फक्त) पेक्षा 24.60% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने रक्कम रूपये 45,23,992/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१९३८ विषय क्रमांक – २१
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– जलनि:सारण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/६०५/१८ दि.४/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.7/13/2017-18 अन्वये कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत फुगेवाडी गावठाण, संजयनगर, रतिलाल भगवानदास झोपडपट्टी परिसर व उर्वरीत ठिकाणी मलनिसारण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकामी M/s.Kapil Constuction यांची नि.र.रू.59,99,979/- (अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख नव्याण्णव हजार नऊशे एकोणऐंशी फक्त) पेक्षा 27.10 % कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.43,73,985/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९३९ विषय क्रमांक – २२
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–अ क्षेत्रिय कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ– मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.अक्षेका/नि/कावि/१३४/२०१८ दि.०२/०१/२०१८

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 32) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४० विषय क्रमांक – २३
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ– मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/०३/२०१८ दि.२/१/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या OT व ICU विभागातील फिलीप्स कंपनीच्या ३ डिफीब्रीलेटर मशीनच्या दुरुस्तीसाठी आवश्यक पार्टस खरेदी करणेकामी फिलीप्स कंपनीचे अधिकृत वितरक मे.सायरॉनिक्स इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि., पुणे यांनी सादर केलेले एकूण र.रु.१,१९,८८८/- (अक्षरी र.रू. एक लाख एकोणीस हजार आठशे अठ्याऐंशी फक्त) चे दरपत्रक

स्विकृत करणेत आले असुन डिफिब्रीलेटर मशीन दुरुस्तीकामी आवश्यक पार्टसचा पुरवठा करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. सबब निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने खरेदीसाठी देण्यात आलेल्या आदेशाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४१ विषय क्रमांक – २४

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/इ-मुख्य/१०/१८ दि.५/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.66/6/2017-18 अन्वये प्रभाग क्र.६ डुडुळगाव गट नं.१८ व २४ मी विकास आराखड्यातील मोशी आळंदी रस्ता माऊली नगर ते पुणे आळंदी रस्ता विकसीत करणेकामी मे.कृष्णाई इंफ्रा.प्रा.ली. यांची नि.र.रू.41,95,56,349/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस कोटी पंच्याण्णव लाख छपन्न हजार तीनशे एकोणपन्नास फक्त) पेक्षा 4.95% जास्त दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा 2.77% कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.44,03,24,388/- पर्यंत काम करून घेणेस तसेच त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-**१) मा.आमदार,.स्थानिक नगरसदस्यांना विचारावे. ८० टक्के जागा ताब्यात आली असल्यामुळे वर्कऑर्डर मिळाल्यानंतर कामास ताबडतोब सुरुवात करावी.

२) दिलेल्या सर्व सूचनांचे पालन केले जावे.

३) कुठल्याही परिस्थितीत कामाचा दर्जा हा राखलाच पाहीजे.

४) वर्कऑर्डर दिल्यानंतर दुस-या दिवशीच कामाला सुरुवात झाली पाहीजे. आणि दिलेल्या मुदतीतच काम संपवले पाहीजे याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

५) बॅरीकेटस् लावले पाहीजेत कामाचा बोर्ड लावावा. बोर्डमध्ये निविदा रक्कम किती आहे, ठेकेदाराचे नाव व संपर्क क्रमांक, त्या वॉर्डमधील नगरसेवकांचा संपर्क क्रमांक, इमर्जन्सीमध्ये संपर्क करायचा संपर्क क्रमांक, अधिका-यांचा संपर्क क्रमांक, काम सुरु केले तो दिनांक आणि काम संपण्याचा दिनांक, इ. सर्व तपशील द्यावा.

----------

ठराव क्रमांक –१९४२ विषय क्रमांक – २५
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ– मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/२६/२०१८ दि.५/१/२०१८

मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४३ विषय क्रमांक – २६
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.निर्मला कुटे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/०४/१८ दि.०५/०१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV9/5-2017-18 अन्वये मनपा अंतर्गत सांगवी मैला शुध्दीकरण केंद्राकरीताचे मैलापाणी पंप हाऊस-सांगवी मुळानगर पंपहाऊसचे वार्षीक चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.एन.सी.वाय. एंटरप्रायझेस यांचेकडून नि.र.रु.५९,०५,४३३/-(अक्षरी र.रू.एकोणसाठ लाख पाच हजार चारशे तेहतीस फक्त) पेक्षा ०२.२७% कमी या सुधारित दराने प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ०३.१२% ने कमी येत असल्याने प्राप्त सुधारित दराने र.रु.५७,७१,३८०/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४४ विषय क्रमांक – २७
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/०३/१८ दि.०५/०१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV9/6-2017-18 अन्वये मनपाचे चिंचवड भाटनगर मैला शुध्दीकरण केंद्राअंतर्गत येणा-या मैला पंप हाऊसेसचे चालन देखभाल व दुरुस्ती करणे कामी (पिंपरी मेन डिलक्स, पिंपरी वाघेरे, पिंपरी लो. लेव्हल व वैभवनगर मैला पंप हाऊस) मे.एन.सी.वाय.एंटरप्रायझेस यांचेकडुन नि.र.रु.२,२१,१३,४४०/- (अक्षरी र.रू.दोन कोटी एकवीस लाख तेरा हजार चारशे चाळीस फक्त) पेक्षा ०२.५२% कमी या सुधारित दराने प्राप्त झालेली आहे. निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ०२.६३% ने कमी येत असल्याने प्राप्त सुधारित दराने र.रु.२,१५,५६,१८१/- पर्यंत काम करुन घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१९४५ विषय क्रमांक – २८
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ–मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/५/कावि/१९/२०१८ दि.४/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.अप्रवि-२०१७/प्रक्र.१०६/आरोग्य-६ दिनांक १७ ऑक्टोबर २०१७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयास पिंपरी चिंचवड मनपाचे कार्यक्षेत्रापुरते अपंगत्व प्रमाणपत्र प्रदान करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्या अनुषंगाने वैद्यकीय मंडळ गठीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्रक्र४६२/भाग-२/आरोग्य-३ दिनांक २८ डिसेंबर २०१५ अन्वये शासकीय रुग्णालयामधुन देण्यात येणा-या वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणारे रुग्णशुल्क दरास मंजुरी दिलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये डोळयांची तपासणी करणेकरीता तसेच श्रवणशक्ती तपासणी करणेकरीता खालीलप्रमाणे सुधारीत रुग्णशुल्क आकारणी करणेस मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | रुग्णसेवा /सुविधा | सुधारीत रुग्णशुल्क दर (रक्कम रुपयात) |
|---|---|---|
| १. | बी.ई.आर.ए. | ३००/- |
| २. | पेरिमेंट्री | नि:शुल्क |

पिंपरी चिंचवड मनपाचे कार्यक्षेत्रातील दिव्यांग (अपंग) व्यक्तींना सदर रुग्णशुल्क आकारुन यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात संगणक प्रणालीव्दारे अपंगत्व प्रमाणपत्र वितरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४६ विषय क्रमांक – २९
दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य इ मुख्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/इ-मुख्य/१२/१८ दि.५/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.30/8/2017-18 अन्वये प्रभाग क्र.३२ सँडविक कॉलनी येथे भोसरी दिघी शिवेवरील रस्ता विकसित करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.ली.यांची नि.र.रू.84,02,874/- (अक्षरी र.रु.चौ-याऐंशी लाख दोन हजार आठशे चौ-याहत्तर फक्त) पेक्षा 3.70% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा, स्विकृती योग्य दरापेक्षा 15.27% कमी येत असल्याने, प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.80,91,968/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलम लागु असल्यास मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक

दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१९४७ विषय क्रमांक – ३०

दिनांक – १०/०१/२०१८ विभाग– स्थापत्य इ मुख्यालय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३/१८ दि.५/१/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

